0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे यांचेकडून दि.०८/११/२०११ रोजी प्राप्त पत्रासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७८/२०११/जा.९०७, दि.११/११/२०११, दि.२४/११/२०११ व दि. ०८/१२/२०११.

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/ प्र.क्र.७८/२०११/जा.९०८ दि.११/११/२०११.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे यांचे दि.२२/११/२०११ रोजीचे अभिवेदन.

५) जे.के. फ्लोअर मिलचे मालक मुरलीधर वलेजा, जे.के. फ्लोअर मिलचे व्यवस्थापक पप्पु तोमर व अ.शि.दु.क्र. ३४ ई/२११ चे प्राधिकारपत्रधारक अनिता लालजी जयस्वाल यांचे दि.२२/११/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

६) लालजी केदारनाथ जयस्वाल उर्फ लालजी गुप्ता यांचे दि.७/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

७) प्रदिप मोतीलाल अग्रवाल यांचे दि.२०/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७८/२०११/जा. 3e
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.

दिनांक :- 29 /०१/२०१२.

### आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २८/१०/२०११ रोजी वाशी पोलिस ठाणे येथील वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांना गुप्त बातमीदारामार्फत फोनद्वारे माहिती मिळाली की, घाटकोपर मुंबई येथून एक ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ हा बेकायदेशिररित्या रेशनिंगच्या गव्हाची विक्री करण्यास घेवून जात आहे. सदर ट्रक ताब्यात घ्यावयाचा आहे. त्याबाबत कळविल्याने पोलिस उपनिरिक्षक श्री. ऋषीकेश संपत पवळ व त्यांचे पोलिस पथक दोन पंचासह सरकारी वाहनाने सुमारे १७.३५ वा. पोलिस ठाण्याहून रवाना होवून १७:५० वा. वाशी गांव येथे पोहचले. सदर ठिकाणी दत्त मंदिराजवळ रोडवर वाशी गांव येथे सुमारे १८:०० वाजता बातमीदाराने दिलेल्या माहिती प्रमाणे ट्रक क्र. एमएच-

११-अेएल-५४८८ हा उभा असलेला दिसला. त्यावरील चालकाकडे चौकशी केली असता, त्याने सदरचा ट्रक हा प्रदिप अग्रवाल याचा असल्याचे सांगून सदरचा रेशनिंगचा गहू घेवून खोपोली येथे जात असल्याचे सांगितले. सदर ट्रकमध्ये रेशनिंगचा गहू घाटकोपर येथील लालजी गुप्ता पूर्ण नाव पत्ता माहित नाही यांनी भरला असून जे.के. मिल खोपोली येथे पोहचवण्याबाबत सांगितले. त्यासाठी खोपोली येथे गेल्यावर संजय नावाच्या इसमास संपर्क साधण्यास लालजी गुप्ता याने सांगितले होते. त्याने त्याच्याकडील चलन सादर केले. सदर चलनावर गणेश ट्रेडिंग कंपनी शॉप नं. ५ बायजाबाई अपार्टमेंट जितेंद्र रोड, मालाड ईस्ट, मुंबई असे लिहिले आहे व सदरचा माल धनश्री ट्रेडिंग कंपनी खोपोली यांच्याकडे देणेबाबत लिहिलेले आहे.

अशाप्रकारे वरील ट्रकमध्ये रेशनिंगचा गहू अवैधरित्या वाहतूक करुन तो खोपोली येथील जे.के. फ्लोअर मिल, धनश्री ट्रेडिंग कंपनी यांना जास्त भावाने स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशिररित्या विक्री करण्यासाठी घेवून जात असताना मिळून आल्याने व त्याबाबत खात्री झाल्याने पंचासमक्ष व ट्रक सहित कामकाज सोईचे जावे म्हणून पोलिस ठाण्यात घेवून आले व सदर मालाबाबत सविस्तर पंचनामा करुन ट्रकसह माल जप्त केला. जप्त ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ व त्यात मिळून आलेले गव्हाची पोती मोजण्याचा प्रयत्न केला. परंतू सदरची पोती ही फुटलेली असल्याने पोत्यांची गणना करणे अशक्य असल्याने सदरचे वाहनासह ARPEE WIEGH BRIDGE सेक्टर १९ वाशी येथे नेवून पंचासमक्ष वजन केले असता, सदर ट्रक व त्यातील मालाचे एकूण १६,२७५ कि.ग्रॅ. असल्याचे दिसून आले. सदर ट्रकमध्ये एकूण अंदाजे २०० पोती प्रत्येकी ५० कि.ग्रॅ. वजनाच्या मुद्देमाल व आरोपींनी सादर केलेले चलन पंचासमक्ष जप्त करुन आरोपीस तपासकामी ताब्यात घेण्यात आले.

दिनांक २९/१०/२०११ रोजी वाशी पोलिस ठाणेचे पोलिस उपनिरिक्षक श्री. पवळ यांनी प्रस्तूत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ मधील रेशनिंगच्या गव्हाच्या पोत्यांची गणना करण्यासाठी पंचासमक्ष ए.पी.एम.सी. मार्केट येथे हमालांच्या मदतीने ट्रकमधून गव्हाच्या पोती खाली उतरविले व सदर पोत्यांपैकी काही पोती खाकी बारदान्यांची व काही प्लॅस्टिकच्या पांढऱ्या रंगाच्या असून पंचासमक्ष सदर पोत्यांची गणना केली असता एकूण २१८ गव्हाच्या पोती असल्याचे निदर्शनास आले व त्यावर एफ.सी.आय. चा मार्क असल्याचे पथकास निदर्शनास आले. वरील प्रमाणे गणना केल्यानंतर सदर हमालांच्या मदतीने पंचासमक्ष सर्व पोती पुन्हा ट्रकमध्ये भरण्यात आल्या व तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणातील आरोपी लालजी केदारनाथ जैस्वाल यांचा वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे यांच्या समक्ष दि.०२/११/२०११ रोजी नोंदविण्यात आलेल्या जबाबामध्ये लालजी जैस्वाल यांनी नमूद केले आहे की,

त्यांच्या ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून त्यांच्या मालकीचे तीन ट्रक आहेत. तसेच कामराज नगर या ठिकाणी गुप्ता ट्रेडिंग कंपनी या नावाने किराणा मालाचे दुकान आहे. तसेच त्यांच्या पत्नी नामे अनिता जैस्वाल यांच्या नावे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११, गुप्ता जनरल स्टोअर्स, पंतनगर, घाटकोपर असा आहे. सदर दुकानात ग्राहकांसाठी येणारा रेशनिंगचा माल ठेवण्यात जातो व त्याचे वितरण केले जाते. त्यांच्या दुकानात १५०० ग्राहकांना रेशनिंगचे मालाचा पुरवठा केला जातो. साधारण १ महिन्यापूर्वी ग्राहकांनी वाटप करण्यासाठी त्यांच्या रेशनिंग दुकानामध्ये २५० पोती गहू आला होता व सदरचा गहू रेशनिंग दुकानात ठेवला होता. रेशनिंगचा गहू प्रदिप अग्रवाल हा जास्त किमंतीने खोपोली येथील विविध मिलमध्ये विकत असतो व तो त्याचा मित्र असल्याने सदरचा गहू खोपोली येथील मिलमध्ये जास्त भावाने विक्री करावयाचा होता, असे सांगितले. त्यानुसार त्यांनी प्रदिप अग्रवाल यांना संपर्क साधून सदरचा रेशनिंगचा गहू खोपोली येथील मिलमध्ये पाठविण्यासाठी विनंती केली असता, प्रदिप अग्रवाल याने जे.के. फ्लोअर मिल, खोपोली चे मॅनेजर श्री. तोमर यांना संपर्क साधून त्यांना रेशनिंगचा गहू पाठवित असल्याचे सांगितले असता, श्री. तोमर यांनी सदरचा गहू पाठवून देण्यास सांगितले. त्यानंतर प्रदिप अग्रवाल यांनी त्यांना संजय या नावाचा फोन नंबर दिला व त्याच्याशी संपर्क साधण्यास सांगून तो सदरचा गहू खोपोली येथे पोहचत करतील व काही अडचणी आल्यास तो पूर्णपणे सांभाळून घेईल असे सांगितले. त्यानुसार लालजी गुप्ता यांनी दि.२८/१०/२०११ रोजी संजय याला फोन करुन रेशनिंगचा गहू घेऊन जाण्यास सांगितले व त्यांच्याकडे असलेल्या ट्रकचा चालक नसल्याने त्यांनी प्रदिप अग्रवाल यांच्याकडील चालक नामे राकेशकुमार वर्मा यांना संजय याचा फोन नंबर देवून व त्यांच्याशी संपर्क साधून सदरचा ट्रक त्यांच्या रेशनिंग दुकानावर घेवून येण्यास सांगितले. सदरचा ट्रक अ.शि.दु.क्र. ३४ ई/२११, गुप्ता जनरल स्टोअर्स, पंतनगर, घाटकोपर या ठिकाणी आल्यानंतर त्यांनी चालकाला ट्रक दुकानासमोर लावून बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर हमालांच्या मदतीने सदर ट्रकमध्ये २१८ रेशनिंगच्या गव्हाच्या पोती भरली व चालक राकेश शर्मा यास गणेश ट्रेडिंग कंपनी, शॉप नं. ५, बायजाबाई अपार्टमेंट, जितेंद्र रोड, मालाड ईस्ट असा पत्ता असलेले टपाल दिले. त्यावर १२० गोणी वजन ५९४० कि.लो. व किंमत रुपये ८०,१९०/- असे निळ्या शाईच्या पेनाने लिहिलेले व त्यावर त्यांनी सही केले असल्याचे सांगितले.

अशाप्रकारे लालजी गुप्ता तसेच संजय यांनी त्यांच्या ताब्यातील बेकायदेशिररित्या बाळगलेला रेशनिंगसाठी पुरवठा केलेला गहू बाळगून तो अवैधरित्या घाटकोपर मुंबई येथून खोपोली येथील जे.के. फ्लोअर मिल, धनश्री ट्रेडिंग कंपनी यांना विक्री करुन तो यातील ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ याचे वरील चालक राकेशकुमार रामादी वर्मा याचे ताब्यात देवून तो घेवून जात असतांना मिळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच

उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ९ चा भंग केल्यावरुन वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. II ४८/२०११ दि.२८/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ | १ नग | ६,००,०००/- |
| २ | उक्त ट्रकमधील २१८ पोती गव्हाचा साठा | १६,२७५ किलो | १,०९,०००/- |
| | | एकूण | ७,०९,०००/- |

सबब, उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. २२/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस वाशी पोलिस ठाणेचे सहा. पोलिस निरिक्षक श्री. दत्तात्रय बाजीराव किंद्रे हे उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस जे.के. फ्लोअर मिलचे मालक मुरलीधर वलेजा, जे.के. फ्लोअर मिलचे व्यवस्थापक पप्पु तोमर व अ.शि.दु.क्र. ३४ ई/२११ चे प्राधिकारपत्रधारक अनिता लालजी जायस्वाल हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि. ०७/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस लालजी केदारनाथ जयस्वाल उर्फ लालजी गुप्ता हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर लेखी निवेदनात प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ हे त्यांच्या मालकीचे असल्याचे सांगितले. तथापी, याबाबतचे परिवहन विभागाचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. तसेच सदर सुनावणील इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि. २०/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस लालजी केदारनाथ जयस्वाल उर्फ लालजी गुप्ता हे उपस्थित राहिले व त्यांनी ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ या वाहनाचे नोंदणीकृत प्रमाणपत्र व पॅन कार्डची छायांकित प्रत सादर केली. सदर सुनावणीस प्रदिप मोतीलाल अग्रवाल हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ७ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीसही इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**<u>युक्तिवाद :-</u>**

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित वाशी पोलिस ठाणेचे सहा. पोलिस निरिक्षक श्री. दत्तात्रय बाजीराव किंद्रे यांनी सादर केलेल्या वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांच्या अभिवेदनात, लालजी केदारनाथ जयस्वाल यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून त्यांच्या मालकीचे तीन ट्रक आहेत. तसेच कामराज नगर या ठिकाणी गुप्ता ट्रेडिंग कंपनी या नावाने किराणा मालाचे दुकान आहे. तसेच त्यांच्या पत्नी नामे अनिता जयस्वाल यांच्या नावे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११, गुप्ता जनरल स्टोअर्स, पंतनगर, घाटकोपर असा आहे. सदर दुकानात ग्राहकांसाठी येणारा रेशनिंगचा माल ठेवण्यात जातो व त्याचे वितरण केले जाते. त्यांच्या दुकानात १५०० ग्राहकांना रेशनिंगचे मालाचा पुरवठा केला जातो. साधारण १ महिन्यापूर्वी ग्राहकांना वाटप करण्यासाठी त्यांच्या रेशनिंग दुकानामध्ये २५० पोती गहू आला होता व सदरचा गहू रेशनिंग दुकानात ठेवला होता. रेशनिंगचा गहू प्रदिप अग्रवाल हा जास्त किमतीने खोपोली येथील विविध मिलमध्ये विकत असतो व तो त्याचा मित्र असल्याने सदरचा गहू खोपोली येथील मिलमध्ये जास्त भावाने विक्री करावयाचा होता, असे सांगितले. त्यानुसार त्यांनी प्रदिप अग्रवाल यांनी संपर्क साधून सदरचा रेशनिंगचा गहू खोपोली येथील मिलमध्ये पाठविण्यासाठी विनंती केली असता, प्रदिप अग्रवाल याने जे.के. फ्लोअर मिल, खोपोली चे मॅनेजर श्री. तोमर यांना संपर्क साधून त्यांना रेशनिंगचा गहू पाठवित असल्याचे सांगितले असता, श्री. तोमर यांनी सदरचा गहू पाठवून देण्यास सांगितले. त्यानंतर प्रदिप अग्रवाल यांनी त्यांना संजय या नावाचा फोन नंबर दिला व त्याच्याशी संपर्क साधण्यास सांगून तो सदरचा गहू खोपोली येथे पोहचत करतील व काही अडचणी आल्यास तो पूर्णपणे सांभाळून घेईल असे सांगितले. त्यानुसार लालजी गुप्ता यांनी दि.२८/१०/२०११ रोजी संजय याला फोन करुन रेशनिंगचा गहू घेऊन जाण्यास सांगितले व त्यांच्याकडे असलेला ट्रकचा चालक नसल्याने त्यांनी प्रदिप अग्रवाल यांच्याकडील चालक नामे राकेशकुमार वर्मा यांना संजय याचा फोन नंबर देवून व त्यांच्याशी संपर्क साधून सदरचा ट्रक त्यांच्या रेशनिंग दुकानावर घेवून येण्यास सांगितले.

सदरचा ट्रक अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११, गुप्ता जनरल स्टोअर्स, पंतनगर, घाटकोपर या ठिकाणी आल्यानंतर त्यांनी चालकाला ट्रक दुकानासमोर लावून बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर हमालांच्या मदतीने सदर ट्रकमध्ये २१८ रेशनिंगच्या गव्हाच्या पोती भरली व चालक राकेश शर्मा यास गणेश ट्रेडिंग कंपनी, शॉप नं. ५, बायजाबाई अपार्टमेंट, जितेंद्र रोड, मालाड ईस्ट असा पत्ता असलेले टपाल दिले. त्यावर १२० गोणी वजन ५९४० कि.लो. व किंमत रुपये ८०,१९०/- असे निळ्या शाईच्या पेनाने लिहिलेले व त्यावर त्यांनी सही केले असल्याचे सांगितले. याबाबत लालजी जयस्वाल यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आलेला असून गुन्ह्याचा पुढील तपास चालू असून प्रस्तूत प्रकरणी धनश्री ट्रेडिंग कंपनी, खोपोली व गणेश ट्रेडिंग कंपनी, मालाड (पूर्व) या पत्त्यावरील दोन्ही आस्थापना अस्तित्वात नसल्याचे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित जे.के. फ्लोअर मिलचे मालक मुरलीधर वलेजा यांनी युक्तीवाद केला की, श्री. पप्पू तोमर हे त्यांच्या कंपनीचे व्यवस्थापक असून त्यांचेकडे उत्पादनासंबंधी कार्यभार आहे. त्यामुळे श्री. पप्पू तोमर यांना कंपनीच्या वतीने कोणत्याही उत्पादनाशी संबंधीत वस्तूंच्या खरेदी व विक्रीचे अधिकार नसून कंपनीचे संचालक हे गव्हाच्या खरेदीचे दर व परिमाणाबाबत निर्णय घेतात. कंपनीचे वतीने खरेदी केलेल्या गव्हाच्या साठ्याचे बिलानुसार चेकद्वारे भरणा करण्यात येत असून त्यांची कंपनी काळाबाजार संबंधी कोणतेही काम करीत नाही. कंपनीच्या वतीने विनाबिलाचा गव्हाचा साठा खरेदी करण्यात येत नसल्याने काळाबाजारातून गव्हाचा साठा खरेदी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. प्रस्तूत प्रकरणी त्यांच्या कंपनीवर खोटा व विद्वेषपूर्ण आरोप करण्यात आला असून त्यामध्ये तथ्य नाही. त्यामुळे सदर जप्त साठ्याचा व वाहनाशी त्यांच्या कंपनीचा काहीही संबंध नसल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित जे.के. फ्लोअर मिलचे व्यवस्थापक पप्पु तोमर यांनी युक्तीवाद केला की, ते कंपनीचे उत्पादन व्यवस्थापक असून त्यांना गहू अथवा इतर साठा कंपनीच्या वतीने खरेदी करण्याचे अधिकार नसल्याने त्यांची उत्पादनाच्या गुण नियंत्रणाची जबाबदारी आहे. प्रस्तूत प्रकरणी लालजी गुप्ता, संजय अथवा प्रदिप यांना ते ओळखत नसून त्यांची कधीही या व्यक्तींशी भेट झालेली नसून त्यांचेवरील लावण्यात आलेले आरोपात तथ्य नसल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अ.शि.दु.क्र. ३४ ई/२११ चे प्राधिकारपत्रधारक अनिता लालजी जयस्वाल यांनी युक्तीवाद केला की, त्या सदर दुकानात येणारे शिधाजिन्नस व शिधापत्रिकाधारकांना वितरण करायचे शिधाजिन्नसचा सर्व कारभार स्वत: उपस्थित राहून करतात. रेशन दुकानाच्या कारभारामध्ये तिचे

पती श्री. लालजी केदारनाथ जयस्वाल हे कोणत्याही प्रकारची दखल किंवा तिच्या नावे असलेल्या दुकानामध्ये कोणत्या प्रकारच्या कामात दखल देत नाहीत. तिच्या पतीचा स्वतंत्र व्यवसाय असून त्या त्यांच्या व्यवसायात काहीही दखल देत नाही किंवा त्यांच्या व्यवसायात काहीही कार्य करत नाही. वाशी पोलिस ठाणेत जप्त गव्हाशी तिचा काही संबंध नाही. तसेच तिच्या दुकानात शासनातर्फे येणारा शिधाजिन्नस ती फक्त शिधापत्रिकाधारकांना स्वतः उपस्थित राहून वितरण करते. जप्त मुद्देमाल सरकार जमा करण्यास तिची काहीही हरकत किंवा तक्रार नाही. तिच्या नावे असलेल्या रेशन दुकानात आतापर्यंत अशी घटना घडलेली नाही. तिचे पती श्री. लालजी केदारनाथ जयस्वाल यांच्याशी तिचे वैवाहिक संबंध असून फक्त घरगुती कामकाजामध्ये त्यांची व तिची दखल असते. तरी ती एक स्त्री असून दोन मुलाचे पालन पोषण करुन तसेच घरगुती कार्य करुन ती सदर रेशन दुकानांचा कार्यभार स्वतः लक्ष देऊन व उपस्थित राहून सावधानपूर्वक कार्य करते. तिच्या मुलांचे पालन पोषण ह्या दुकानावर अवलंबून आहे. तिची हि विनंती स्विकारुन तिला योग्य ते आदेश देण्यात यावे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित लालजी केदारनाथ जयस्वाल उर्फ लालजी गुप्ता यांनी युक्तीवाद केला की, मोटार ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ हा त्याच्या मालकीचा आहे. त्याने त्याचा चालक राकेश वर्मा याला ९,०००/- रुपये मासिक पगारावर ठेवलेला होता. तसेच मोटार चालक याच्याशी असे नक्की झाले होते की, कोणत्याही गाडीचा धंदा करण्यासाठी गाडीचे भाडे मारुन गाडीमध्ये डिझेल टाकून उर्वरित रक्कम त्याला द्यावी. दिनांक २८/१०/२०११ रोजी गाडी त्याचा चालक राकेश वर्मा याच्या ताब्यात होती. परंतू त्यांनी कोठून गहू भरला व कोठे माल घेऊन जात आहे, याची त्याला माहिती नव्हती. दिनांक २८/१०/२०११ रोजी रात्री दहा वाजताच्या दरम्यान त्याला माहिती मिळाली की, वाशी पोलिस ठाणे येथे बेकायदेशिर रेशनिंग गहू, वाहतूक केल्याबाबत गुन्हा नोंद केलेला आहे. आपल्या कारणे दाखवा नोटीसीनुसार पोलिस ठाणेस जप्त गव्हाशी त्याचा काहीही संबंध नाही. तसेच वाशी पोलिस ठाणेत जप्त मोटार वाहन त्याचे मालकी हक्काचे असून त्याला त्याचे मोटार वाहन परत देण्यात यावे, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित प्रदिप मोतीलाल अग्रवाल यांनी युक्तीवाद केला की, वाशी पोलिस ठाणेत जप्त केलेल्या गव्हाशी त्याचा काही संबंध नाही. तसेच वाशी पोलिस ठाणेतील जप्त मुद्देमाल शासनजमा करण्यास त्याची काहीही हरकत नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २८/१०/२०११ रोजी वाशी पोलिस ठाणे येथील वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांना गुप्त बातमीदारामार्फत फोनद्वारे माहिती मिळाल्यानुसार पोलिस उपनिरिक्षक श्री. ऋषीकेश संपत पवळ व त्यांचे पोलिस पथक दोन पंचासह वाशी गांव येथे सुमारे १८:०० वाजता ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ हा उभा असलेला दिसला. त्यावरील चालकाकडे चौकशी केली असता, त्याने सदरचा ट्रक हा प्रदिप अग्रवाल याचा असल्याचे सांगून सदरचा रेशनिंगचा गहू घेवून खोपोली येथे जात असल्याचे सांगितले. सदर ट्रकमध्ये रेशनिंगचा गहू घाटकोपर येथील लालजी गुप्ता पूर्ण नाव पत्ता माहित नाही यांनी भरला असून जे.के. मिल खोपोली येथे पोहचवण्याबाबत सांगितले. त्यासाठी खोपोली येथे गेल्यावर संजय नावाच्या इसमास संपर्क साधण्यास लालजी गुप्ता याने सांगितले होते. त्याने त्याच्याकडील चलन सादर केले. सदर चलनावर गणेश ट्रेडिंग कंपनी शॉप नं. ५ बायजाबाई अपार्टमेंट जितेंद्र रोड, मालाड ईस्ट, मुंबई असे लिहिले आहे व सदरचा माल धनश्री ट्रेडिंग कंपनी खोपोली यांच्याकडे देणेबाबत लिहिलेले आहे. अशाप्रकारे वरील ट्रकमध्ये रेशनिंगचा गहू अवैधरित्या वाहतूक करुन तो खोपोली येथील जे.के. फ्लोअर मिल, धनश्री ट्रेडिंग कंपनी यांना जास्त भावाने स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशिररित्या विक्री करण्यासाठी घेवून जात असताना मिळून आल्याने व त्याबाबत खात्री झाल्याने सदर ट्रकमध्ये एकूण अंदाजे २०० पोती प्रत्येकी ५० कि.ग्रॅ. वजनाच्या मुद्देमाल व आरोपींनी सादर केलेले चलन पंचासमक्ष जप्त करुन आरोपींस तपासकामी ताब्यात घेण्यात आले. ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ मधील रेशनिंगच्या गव्हाच्या पोत्यांची गणना करण्यासाठी पंचासमक्ष ए.पी.एम.सी. मार्केट येथे हमालांच्या मदतीने सदर पोत्यांची गणना केली असता एकूण २१८ गव्हाच्या पोती असल्याचे निदर्शनास आले व त्यावर एफ.सी.आय. चा मार्क असल्याचे पथकास निदर्शनास आले. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला. अशाप्रकारे संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एक ट्रक व २१८ पोती गव्हाचा (१६२७५ किलो) साठा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

लालजी केदारनाथ जयस्वाल व प्रदिप मोतीलाल अग्रवाल यांनी यापूर्वीही संगणमत करुन अवैधरित्या शासन नियंत्रित दराचा गव्हाचा साठा गैरमार्गाने विक्री व पुरवठा करीत असतांना आढळून आल्याने त्यांचेविरुध्द मानखूर्द पोलिस ठाणे येथे स्था.गु.क्र. ११२९/२०११ दि. १७/०९/२०११ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

प्रस्तूत प्रकरणी ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ चे चालक राकेश कुमार वर्मा यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, सदरचा ट्रक हा प्रदिप अग्रवाल याचा असल्याचे सांगून त्यामध्ये रेशनिंगचा गहू खोपोली येथे घेऊन जात असल्याचे सांगून ट्रकमध्ये रेशनिंगचा गहू घाटकोपर येथील लालजी गुप्ता यांनी भरला असून खोपोली येथील जे.के. फ्लोअर मिल येथे पोहचविण्याबाबत सांगून त्यासाठी संजय नावाच्या इसमास संपर्क साधण्यास सांगितले व ट्रक सोबत गणेश ट्रेडिंग कंपनी, मालाड (पूर्व) या नावाचे चलन देऊन त्यावर धनश्री ट्रेडिंग कंपनी, खोपोली असे लिहिले असल्याबाबत सांगितले आहे. तसेच लालजी केदारनाथ जयस्वाल यांनी दिलेल्या जबाबात, जप्त करण्यात आलेला गव्हाचा साठा त्यांनी त्यांच्या पत्नीच्या नावे घाटकोपर येथे असलेल्या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११ या दुकानातून भरला असल्याचे सांगून सदर दुकानात शिधापत्रिकाधारकांना वाटप करण्यासाठी आलेला गहू प्रदिप अग्रवाल हा जास्त किमंतीने खोपोली येथे विविध मिलमध्ये विकत असल्याने त्याने त्याचा मित्र प्रदिप अग्रवाल याच्याशी संपर्क साधून सदर गव्हाचा साठा मिलमध्ये पाठविण्यास विनंती केली. त्यानुसार लालजी केदारनाथ जयस्वाल यांनी ट्रक चालक राकेश कुमार वर्मा याचेशी संपर्क साधून नमूद अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११ मधून हमालांच्या मदतीने सदर ट्रकमध्ये २१८ पोती गव्हाचा साठा भरला असल्याचे कबूल केले आहे. तसेच सदर गुन्ह्याचा पुढील तपासामध्ये बिलांवर धनश्री ट्रेडिंग कंपनी, खोपोली व गणेश ट्रेडिंग कंपनी, मालाड (पूर्व) हे नाव असलेले दोन्ही आस्थापना त्यांच्या नमूद पत्त्यावर अस्तित्वात नसल्याचे पोलिसांना आढळून आले आहे.

उपरोक्त युक्तीवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेता लालजी केदारनाथ जयस्वाल व प्रदिप अग्रवाल यांनी संगणमत करुन प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला गव्हाचा साठा हा शासन नियंत्रित दराचा गहू अवैध मार्गाने व काळाबाजाराने विक्री करण्याकरिता घेऊन जात असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. यावरुन सर्व संबंधितांनी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११ या दुकानामधील शासनाने शिधापत्रिकेव्दारे शिधापत्रिकाधारंकाना वाटप करण्यासाठी अनुदानित दराने उपलब्ध करुन दिलेला गव्हाचा साठ्यापैकी २१८ पोती गव्हाचा साठा पात्र शिधापत्रिकाधारंकाना वितरीत न करता बेकायदेशीररित्या मिळवून परस्पर संगणमत करुन काळाबाजार व जादा नफेखोरीच्या उद्देशाने विक्री व वाहतूक केली असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७८/२०११/जा.९०८, दिनांक ११/११/२०११ कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तसेच प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ चे चालक राकेश कुमार वर्मा यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, सदरचा ट्रक हा प्रदिप अग्रवाल याचा असल्याचे सांगून त्यामध्ये रेशनिंगचा गहू खोपोली येथे घेऊन जात असल्याचे सांगितले. तथापी, लालजी केदारनाथ जयस्वाल यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे यांच्या समक्ष दिलेल्या जबाबात, ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ हा त्याच्या मालकीचा असल्याचे सांगितले. प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला गव्हाचा साठा त्याने घाटकोपर येथील त्यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११ या दुकानातून पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्यासाठी असलेला गव्हाचा साठा त्याने अनधिकृतरित्या हमालांच्या मदतीने २१८ पोती गहू काळाबाजाराने व नफेखोरीच्या उद्देशाने विक्री करण्यासाठी त्याच्या ट्रकमध्ये भरुन घेतला असल्याचे त्यांनी दिलेल्या जबाबात कबूल केले आहे. यावरुन लालजी केदारनाथ जयस्वाल याने सर्व संबंधितांशी संगणमत करुन सदरचा जप्त गव्हाचा साठा हा शासन नियंत्रित दराचा असल्याचे माहित असून सुध्दा तो गैरमार्गाने विक्री करण्यासाठी त्याच्या मालकीच्या ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ चा वापर त्याने अवैध वाहतूकीसाठी केल्याचे सिध्द होत आहे. यावरुन ट्रक मालक लालजी केदारनाथ जयस्वाल याचा सदर गुन्हा नोंद प्रकरणी प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. II ४८/२०११ दि.२८/१०/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) या कार्यालयाचे दि. ११/११/२०११ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर ट्रकची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ चा चालक, राकेशकुमार रामादी वर्मा
२) ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ चा मालक, प्रदिप अग्रवाल
३) लालजी केदारनाथ जैस्वाल उर्फ लालजी गुप्ता
४) संजय
५) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११ चे मालक
६) जे.के. फ्लोअर मिल, खोपोली चे मालक
७) जे.के. फ्लोअर मिल, खोपोली चे व्यवस्थापक नामे तोमर

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

५) कार्यासन अधिकारी, दुकान शाखा, का.क्र. १०, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता.

६) कार्यासन अधिकारी, मागणी शाखा, का.क्र. २, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता.

७) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.